प्राचीन काळापासूनच तथागत बुद्धाचे जीवन हे लोकांच्या आकर्षणाचा, आस्थेचा व श्रद्धेचा विषय राहिलेला आहे. म्हणूनच त्यांच्या जीवनावर प्राचीन काळापासून वर्तमान काळापर्यंत व भारताशिवाय विदेशामध्ये सुद्धा फार मोठ्या प्रमाणात साहित्य रचना झालेली आहे आणि ही प्रक्रिया असंख्य वर्षे मानव समाजात राहिली हे कुणालाही अमान्य करता येत नाही. प्राचीन काळापासून आतापर्यंत व भारतात आणि भारताच्या बाहेर बुद्धाच्या जीवन चरित्रावर जेवढ्या साहित्याची रचना झालेली आहे त्या सर्वांचा येथे उल्लेख करणे सुद्धा शक्य नाही. तरी सुद्धा भदंताचार्य बुध्दघोस द्वारा लिखित निदानकथा (जातक अट्ठकथायमागता) अतिशय महत्त्वाची आहे. हा पाली ग्रंथ गद्य-पद्य अशा दोन्ही शैलीमध्ये लिहिण्यात आलेला आहे. या ग्रंथाचा रचनाकाळ सामान्यपणे इसवी सनाचे चौथे - पाचवे शतक मानण्यात येते. हा ग्रंथ पाली भाषेमध्ये लिहिल्या गेलेला आहे. पाली प्रमाणेच बौद्धसंस्कृतमध्ये सुद्धा भगवान बुद्धाच्या जीवनावर साहित्य रचना करण्यात आलेली आहे. बौद्ध संस्कृतमध्ये महावस्तु नावाचा अतिशय महत्वाचा ग्रंथ आहे. त्याचप्रमाणे बौद्ध संस्कृतमध्ये ललितविस्तार, सद्धर्मपुण्डरिक सूत्र आहे. हे दोन्ही ग्रंथ काव्य शैलीमध्ये आहेत व भगवान बुद्धाच्या जीवन चरित्रावर लिहिण्यात आलेले आहेत. महायानी बौद्ध परंपरेमध्ये ललितविस्तार व सद्धर्मपुण्डरिकसूत्र या ग्रंथांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

भगवान बुद्धाच्या जीवनावरील आणखी एक महत्त्वाचा काव्यग्रंथ म्हणजे आचार्य अश्वघोष द्वारा लिहित बुद्धचरित्र होय. त्याचप्रमाणे महायानी बौद्ध परंपरेमधील महाभिनिष्क्रमणसूत्र हा ग्रंथ सुद्धा अतिशय महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे नंतरच्या काळामध्ये भगवान बुद्धाच्या जीवनावर लिहिलेल्या संक्षिप्त जीवनचरित्रामध्ये जिनालंकार व जिनचरित्र हे पाली ग्रंथ सुद्धा अतिशय महत्त्वाचे मानल्या गेलेले आहेत. हे दोन्ही ग्रंथ आज नागरी लिपिमध्ये प्रकाशित झालेले आहे. हे दोन्ही पाली काव्य ग्रंथ पाली त्रिपिटकामध्ये आलेल्या भगवान बुद्धासंबंधीच्या माहितीवरती आधारलेले आहेत.[३] इसवी सनाच्या पंधराव्या शतकामध्ये सीलोनमध्ये सिंहली भाषेमध्ये पद्यशैलीमध्ये वीदागम मेत्तेय महाथेरो यांनी बुद्धगुणालंकार नावाचा ग्रंथ लिहिलेला होता. या ग्रंथाचे हिंदी भाषांतर डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांनी केले होते व हा ग्रंथ सन १९६० मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथामध्ये सुद्धा भगवान बुद्धाच्या जीवनासंबंधी बरीचशी माहिती आलेली आहे. अशाप्रकारे भगवान बुद्धाच्या जीवन चरित्राविषयी अनेक ग्रंथांचा उल्लेख करता येईल. आज आधुनिक भारतीय भाषामध्ये व प्रामुख्याने मराठी, हिंदी इत्यादी भाषामध्ये भगवान बुद्धाच्या जीवन चरित्रासंबंधी असंख्य पुस्तके आहे. परंतु भगवान बुद्धाच्या जीवनचरित्राचे जे मूख्य साहित्य साधन उपलब्ध आहे त्या पाली त्रिपिटकामध्ये भगवान बुद्धाच्या जीवनासंबधी जी माहिती उपलब्ध आहे तिचा अभ्यास करणे आवश्यक आहे व हाच या प्रकरणाचा मुख्य विषय आहे.

बुध्दाचे व्यक्तिमत्त्व :

मज्झिमनिकायमधील अनेक सुत्तामध्ये भगवान बुद्धाच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन आलेले आहे. परंतु ते वर्णन विस्ताराने आलेले नसून थोडक्यात आलेले आहे. मज्झिमनिकाय हा ग्रंथ भगवान बुद्धाच्या उपदेशांचा संग्रह आहे, जीवनचरित्र सांगणारा ग्रंथ नाही. तरी परंतु या ग्रंथामध्ये भगवान बुद्धासंबंधी जी माहिती आलेली आहे ती ऐतिहासिक माहिती आहे. मज्झिमनिकायच्या सल्लेखसुत्तामध्ये भगवान बुद्धासंबंधी अशी माहिती आलेली आहे की, एकदा भगवान बुद्ध महान भिक्खू संघासह कोसल देशामध्ये चारिका करीत जेथे कोसलांचे साला नावाचे गाव होते, तेथे गेले. साला निवासी ब्राह्मण गहपतिंनी म्हणजेच गृहस्थ (धनी- व्यापारी) ब्राह्मणांनी भगवान बुद्धाविषयी असे ऐकलेले होते -

"समणो खलु, भो गौतमो सक्यपुत्तो सक्यकुला पब्बजितो कोसलेसु चारिकं चायानो महता भिक्खुसंघेन सद्धिं सालं अनुप्पत्तो । तं खो पन भगवन्तं गौतमं एवं कल्याणो कित्तिसद्दो अब्भुग्गलो" "इतिपि सो भगवा अरहं, सम्मासम्बुद्धो, विज्जाचरणसम्पन्नो, सुगतो लोकविदू, अनुत्तरो, पुरिसदम्मसारथि, सत्था देवमनुस्सानं, बुद्धो भगवति। तो इमं लोकं सदेवकं समारंक सब्रह्मकं सस्समणब्राह्मणि पजं सदेवमनुस्सं सयं अभिञ्ञा सच्छिकत्वा पवेदेति । सो धम्मं देसेति आदिकल्याणं मज्झं कल्याणं परियोसानकल्याणं सात्थं सव्यञ्जनं, केवलपरिपुण्णं परिसुद्धं ब्रह्मचरियं पकासेति । साधु खो पन तत्थारूपानं अरहतं दस्सनं होती ति"[१९६]

अर्थात शाक्य कुलपुत्र, शाक्यकुलातून प्रव्रजित हा श्रमण गौतम कोसलांच्या प्रदेशामध्ये चारिका करीत महान भिक्खू संघासोबत शालवनामध्ये पोहचलेत. त्या भगवान गौतमाचा अशा प्रकारची कल्याणकारी प्रसिद्धी आहे की, तो भगवान अरहंत, सम्यकसंम्बुद्ध, विद्या व आचरणाने संपन्न, सुगत, जगाला जाणणारा, अनुत्तर, पुरूषांचे दमन करून सारथ्य करणारा, देव व मनुष्याचा शास्ता, भगवान बुद्ध आहे. तो ह्या जगाला, देवतासह भारासह, श्रमण व ब्राह्मणासह, देव व मनुष्यासह संपूर्ण प्रजेला स्वतः जाणून, अनुभव करून प्रगट करतो, प्रकाशित करतो. तो अशा धम्माचा उपदेश करतो जो अर्थासह, व्यंजनासह प्रारंभी कल्याणकारक आहे, मध्यकल्याणकारक आहे, शेवटीही कल्याणकारक आहे, त्याचप्रमाणे अत्यंत परिपूर्ण परिशुद्ध अनासक्त जीवनाला प्रकाशित करतो. हे अतिशय उत्तम आहे की तेथे प्रत्यक्ष अरहंताचे दर्शन होतात. अशा प्रकारे भगवान बुद्धाच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन आलेले आहे. अशा प्रकारचे तथागताच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन मज्झिमनिकायच्या वत्थसुत्त, सल्लेखसुत्त, अपण्णकसुत्त, सन्दकसुत्त, ब्रह्मायुसुत्त, चंकिसुत्त इत्यादी सुत्तामध्ये आलेले आहे. वरील सुत्तामध्ये सिद्धार्थ गौतमासंबंधीची अतिशय महत्त्वाची म्हणजे ते शाक्यपुत्र आहे. शाक्य कुळात जन्मलेले आहेत ही माहिती अतिशय महत्त्वाची आहे. येथे भगवान बुद्धाचे लौकिक रूप, मानवीय रूप वर्णन करण्यात आलेले आहे. याशिवाय मज्झिमनिकायमधील अनेक सुत्तामध्ये भगवान बुद्धाचे मानवीय रूप व्यक्त झालेले आहे.

बुद्ध जीवन कथा :

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

मज्झिमनिकायमधील काही सुत्तामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या व काही काल्पनिक जीवन कथा सुद्धा आलेल्या आहेत. साहित्यामध्ये वास्तवापेक्षा ऐतिहासिकतेपेक्षा व मानवीयपेक्षा काल्पनिकतेचा भाग अधिक असतो. अभ्यासकांना व प्रामुख्याने सामान्य अभ्यासकांना काल्पनिक कथेचा भाग फार आवडतो हे सर्वांना माहिती आहे. पाली त्रिपिटकामध्ये व मज्झिमनिकायमध्ये सुद्धा भगवान बुद्धाचे महत्व, श्रेष्ठत्व, महानत्त्व वर्णन करण्याकरिता भगवान बुद्धाच्या जीवनाच्या काही कथा सांगितल्या गेलेल्या आहेत. पाली साहित्यांचे हे वैशिष्ट्य आहे की जेव्हा जेव्हा वेगवेगळ्या ब्राह्मण लोकांनी, ब्राह्मण आचार्यांनी, प्राचार्यांनी भगवान बुद्धाचे महानपण नाकारले तेव्हा तेव्हा त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्याकरिता बुद्ध कथा रचल्या गेलेल्या आहेत. भेदवादी परंपरेमध्ये पाली त्रिपिटकातील बुद्ध कथांना ऐतिहासिक महत्त्व देण्यात आलेले नाही. परंतु त्यांचा साहित्यिक आनंद मात्र घेण्यात आलेला आहे.

संगारव सुत्तामध्ये एक अतिशय महत्त्वाची बुद्ध कथा आलेली आहे. प्रसंग अशा प्रकारचा आहे की, एकदा भगवान बुद्ध महान भिक्खू संघासोबत कोसल (जनपद) मध्ये चारिका करीत होते. त्यावेळी मंडलकप्पमध्ये धानंजानी नावाची ब्राह्मणी रहात होती व ती बुद्ध, धम्म आणि संघासोबत अतिशय श्रद्धावान होती. धानंजानी ब्राह्मणीने अडखडत तीनदा उदान म्हटले[१९७]

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स|

त्यावेळी मंडलकप्पमध्ये संगारव नामक मानवक (ब्राह्मण तरूण) रहात होता. तो तिन्ही वेदांमध्ये पारंगत होता. त्याने धानंजानी ब्राह्मणीचा भगवान बुद्धाची प्रशंसा करताना ऐकले व तो म्हणाला की, ही धानंजानी ब्राह्मणी अमंगला आहे, ती विनाशकारी आहे, ती ब्राह्मणामध्ये राहुन त्या मुण्डक श्रमणाची प्रशंसा करीत आहे. बुद्धाप्रती ब्राह्मणांची ही सामान्य मानसिकता होती. मज्झिमनिकायमध्ये असे अनेक सुत्त आहेत ज्यात ब्राह्मणांनी सहजासहजी भगवान बुद्धाचे महानपण मान्य केलेले नाही. संगारव सुत्तामध्ये भगवान बुद्धाने संगारव माणवाला म्हटले-

हे भारद्वाज ! मी दृष्टधर्म, अभिज्ञा, व्यवसान, पारमिता प्राप्त करून आदिब्रह्मचर्येचा दावा करणाऱ्यामध्ये फरक करतो. काही-काही श्रमण-ब्राह्मण आनुश्रावक आहेत, ते श्रृतीद्वारे दृष्टधर्म ... पारमिता प्राप्त करून आदिब्रह्मचर्येचा दावा करतात. त्यात काही तीन्ही वेदांचे अनुयायी ब्राह्मण आहेत परंतु हे भारद्वाज जे श्रमण ब्राह्मण आधी न ऐकल्या गेलेले. आदिब्राह्मणचर्येचा दावा करतात. त्यातील मी एक आहे. हे भारद्वाज ! बोधी प्राप्तीच्या आधी बुद्ध न होता बोधिसत्व असतांना, मला असे वाटले की, गृहस्थजीवन अतिशय गुंतागुतीचे व विकारयुक्त आहे. प्रव्रजा मोकळे मैदान आहे. ह्या नितांत, अत्यंत परीपूर्ण, अत्यंत परिशुद्ध, उज्वल जीवनाचे पालन घरी राहून करणे शक्य नाही. तेव्हा मी डोके, दाढी, मिशा कापून कासाय चीवर परिधान करून घराचा त्याग करून प्रव्रजीत कां होऊ नये ? म्हणून मी तरूण अवस्थेत, काळे केस असलेला, सुंदर तारूण्य असलेला, तारूण्याला प्राप्त, आई-वडिलांना रडत असतांना घराचा त्याग करून प्रव्रजित झालो. अशाप्रकारे प्रव्रजित होऊन कुशलांचा सशोधक होऊन, अनुत्तर शांतीपदाचा शोध घेत जेथे आलारकालाम होते तेथे गेलो... जेथे उद्दक रामपृत्त होता तेथे गेलो.. तेथे उदास होऊन निघून गेलो. तेव्हा उत्तम काय आहे याचा शोध घेत, सर्वोत्तम शांतीपदाला शोधीत मगधमध्ये चारिका करीत उरूवेला सेनानी निगमामध्ये गेलो. तेथे ध्यान करू लागलो. कारण ती जागा अतिशय रमणीय होती. अशाप्रकारे भगवान बुद्धाने आपल्याविषयी बरीचशी ऐतिहासिक माहिती संगारव मानवाला सांगितलेली आहे.

मज्झिमनिकायच्या बोधिराजकुमारसुत्तामध्ये ही अशाच प्रकारे भगवान बुद्धाने बोधिराजकुमारला आपली जीवनकथा सांगितलेली आहे.

बोधिराजकुमार सुत्तामध्ये जी बुद्ध जीवनी अर्थात बुद्धकथा आलेली आहे ती त्यांच्या गृहत्यागापासून तर बुद्धत्व प्राप्तीपर्यंत आहे. त्याचप्रमाणे पासरासिकसुत्तामध्ये सुद्धा भगवान बुद्धाची जीवनकथा आलेली आहे. ही बुद्धकथा सुद्धा भगवान बुद्धाच्या गृहत्यागापासून तर बुद्धतत्वाच्या प्राप्ती पर्यंतची कथा आलेली आहे. अशाप्रकारे मज्झिमनिकायमध्ये प्रामुख्याने महासीहनादसुत्त, पासरासियसुत्त, बोधिराजकुमारसुत्त, संगारवसुत्त, इत्यादीमध्ये आलेली बुद्ध कथा सिद्धार्थ गौतमाच्या गृहत्यागापासून तर बुद्धत्व प्राप्तीपर्यंत आहे. बुद्धकथा ही जवळजवळ सारखीच आहे. मज्झिमनिकायमधील अच्छरियधम्मसुत्तामध्ये भगवान बुद्धाच्या उत्पन्न होण्यासंबंधी अर्थात जन्म घेण्यासंबंधी कथा आलेली आहे.

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Amravati

अच्छरियधम्मसुत्तामधील बुद्धाच्या उत्पन्न होण्यासंबंधीची कथा काल्पनीक आणि अलौकिक अशी आहे. ही कथा केवळ बुद्धाचे महत्त्व वर्णन करणारी आहे. परंतु या सुत्तामध्ये बुद्ध उत्पन्न होण्यासंबंधी हा ऐतिहासिक व मानवीय भाग अपवादात्मक आहे.

महासिंहनाद सुत्तामध्ये सिद्धार्थ गौतमाची जी जीवन कथा आलेली आहे ती कथा सुनक्खत्त लिच्छवीपूत्राने बुद्धाच्या धम्माचा त्याग करेल असे भाष्य केले. श्रमण गौतमाकडे आर्य ज्ञान तत्त्वज्ञानाची उच्चत्तमता नाही, दिव्य शक्ति नाही, असे तो म्हणू लागला. ही गोष्ट आयु. सारिपुत्ताला कळली. तो भगवान बुद्धाकडे गेला व त्याने भगवान बुद्धाला सुनक्खत्त लिच्छवीपुत्र अपप्रचार करीत असल्यासंबंधी सांगितले. तेव्हा भगवान बुद्धाने सुनक्खत्त लिच्छवीपुत्राला मोघ पुरूष म्हटले व व्यर्थ व्यक्ति म्हटले त्यावेळी तथागताने दहा-बळ (सामर्थ्य) आहेत. तथागत धम्मचक्राचे प्रवर्तन करतो. तथागत तर्काने प्राप्त धम्माचा उपदेश करतो. तथागत गुणसंपन्न आहे. अशाप्रकारे या सुत्तामध्ये तथागताने आपल्या योग्यतेविषयी, सामर्थ्याविषयी सारिपुत्ताला सविस्तरपणे सांगितलेले आहे.[२००] एकप्रकारे तथागताने बुद्धत्व प्राप्तीनंतरच्या जीवनातील सामर्थ्यांचे वर्णन करून सांगितलेले आहे. या सुत्तामध्ये एक प्रकारे फार मोठ्या प्रमाणात बुद्ध आपला विश्वास व्यक्त करतांना आढळून येतात.

पासरासिसुत्तामध्ये भगवान बुद्धाने आपल्या जीवनासंबंधी व प्रामुख्याने बुद्धत्व प्राप्तीच्या आधीच्या जीवनाची माहिती आलेली आहे. एकदा भगवान बुद्ध आयु. आनंदासोबत श्रावस्थी शेजारी असलेल्या रम्यक ब्राह्मणाच्या आश्रमामध्ये गेले. तेथे भगवान बुद्धाने भिक्खूंना उपदेश दिला. ते म्हणाले की, भिक्खूओं, मी सुद्धा ज्ञान-प्राप्तीच्या आधी, बुद्धत्व प्राप्त करण्यापूर्वी बोधिसत्व असतांना स्वतः उत्पन्न होण्याच्या स्वभावाला जाणून घेऊन उत्पन्न होण्याचा प्रयत्न करीत होतो. तेव्हा मी भिक्खूंनो, दुसऱ्या वेळी तरूण, अतिशय काळे केस असलेला, सुंदर तारूण्य प्राप्त.. अनुच्छुक आई-वडिलांना रडतांना सोडून... प्रव्रजित झालो... अशा प्रकारची कथा या सुत्तामध्ये आलेली आहे. म्हणजेच ही बुद्धकथा भगवान बुद्धाच्या गृहत्यागापासून तर बुद्धत्त्व प्राप्ती पर्यंतचीच आहे. शिवाय स्वतः भगवान बुद्धाने भिक्खूंना सांगितलेली होती, असे या सुत्तात म्हटलेले आहे.[२०१] या कथेमध्ये पंचवर्गीय भिक्खूंचा उल्लेख आलेला आहे, त्याचप्रमाणे इसिपतन मिगदायचाही उल्लेख आलेला आहे. या सुत्तामध्ये भगवान बुद्धाच्या गृहत्यागाच्या कारणांची कुठेही चर्चा आल्यांचे आढळून येत नाही. या सुत्तामध्ये भगवान बुद्ध केवळ ऐवढेच म्हणतात की, मी तरूण होतो. अत्यंत काळे केस असलेला होतो, सुंदर होतो, भर तारूण्यात होतो, आणि आई-वडिलांना रडत सोडून मी प्रव्रज्याग्रहण लोकांना व भिक्खूंना सुद्धा हेच सांगितलेले आहे. मज्झिमनिकायमध्ये कुठेही भगवान बुद्धाच्या गृहत्यागापूर्वीचे जीवनाचे वर्णन आढळून येत नाही. परंतु मज्झिमनिकायमध्ये त्यांच्या कुळाचा उल्लेख आहे, वंशाचा उल्लेख आहे व त्यांच्या मावशीच्या नावाचाही उल्लेख आलेला आहे.

बोधिराजकुमार सुत्तामध्येही भगवान बुद्धाने बोधिराजकुमारला आपल्या जीवन कथेसंबंधी हेच सांगितलेले आहे की, बोधिराजकुमार बोधीप्राप्तीच्या आधी, बुद्धत्त्व प्राप्त केलेले नसतांना व बोधीसत्त्व असतांना मला सुद्धा असेच वाटत होते की, सुखामध्ये सुख प्राप्त होत नाही, तर दुःखामध्ये सुख प्राप्त होत असते. म्हणून मी त्यावेळी तरूण असतांना काळे केस असलेला, सुंदर तारूण्य असलेला, वय प्राप्त असलेला, आई-वडिलांना रडत ठेवून, घराचा त्याग करून प्रव्रजित झालो. अशाप्रकारे प्रव्रजित होऊन जेथे आलारकालाम होता तेथे गेलो. नंतर सर्वोत्तम शांतीचा शोध घेत जेथे उदकरामपुत्त होता तेथे गेलो. त्यांच्या शिकवणुकीने उदास होऊन निघून गेलो. नंतर काय उत्तम आहे याचा शोध घेत सर्वोत्तम, श्रेष्ठ शांतीपदाचा शोध घेत मगधमध्ये अनुक्रमे चारिका करीत, जेथे उरूवेल सेनानी-निगम होते, तेथे गेलो. तेथे मी रमणीय भूमी-भाग, सुंदर-वनखंड, वाहणारी नदी, शेत, सप्रतिष्ठित, चारही बाजूला रमणीय गाव पाहिले... तेथेच बसलो. मला त्यावेळी अदभूत व पूर्वी न ऐकलेल्या तीन उपमांचे भान झाले.

हे राजकुमार ज्याप्रमाणे ओले लाकुड पाण्यामध्ये ठेवले व एखादा पुरूष अग्नि तयार करीत, उष्णता उत्पन्न करीत अशा भावनेने उत्तरारणी घेऊन आला आणि त्या पुरूषाने ओल्या व पाण्यात भिजलेल्या लाकडाला घासून अग्नि तयार करण्याचा प्रयत्न केला तर त्यापासून अग्नि (विस्तव) उत्पन्न होईल काय ? कारण ते लाकूड ओले आहे व ते पाण्यामध्येही टाकलेले आहे.

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

त्याचप्रमाणे व्यक्तिद्वारे कामवासनांनी युक्त होऊन विचरण करतो, जी त्याची कामवासनामध्ये आसक्ती आहे, इच्छा आहे, मोह आहे व कामवासना आतून नष्ट झालेल्या नाहीत तर तो प्रयत्न करून सुद्धा तो व्यक्ति भयंकर दुःख, वेदना सहन करीत आहे. आणि तो व्यक्ति ज्ञान-दर्शन व अनुत्तर संबोधीला प्राप्त करण्यास अयोग्य आहे. मला ह्या पहिल्या अद्‌भूत व पूर्वी न ऐकलेल्या उपमाचे भान झाले.

हे राजकुमार ! मला दुसऱ्या अद्‌भूत व पूर्वी व ऐकलेल्या उपमाचे भान झाले. ज्याप्रमाणे ओले लाकूड पाण्याशेजारी वाळल्या जागेवर फेकले असावे आणि एखाद्या व्यक्तिने उत्तरारणी घेऊन यावे व म्हणाव की अग्नि उत्पन्न करणार, उष्णता उत्पन्न करणार, तर तो व्यक्ति अग्नि उत्पन्न करणार काय, उष्णता निर्माण करणार काय ?

भन्ते ! तो अग्नि उत्पन्न करणार नाही. कारण ते लाकुड ओले आहे व पाण्याच्या शेजारी वाळल्या जागेवर फेकलेले आहे. तो व्यक्ति केवळ थकून जाईल.

त्याचप्रमाणे हे राजकुमार ! जो व्यक्ति (समण किंवा ब्राह्मण) कायेद्वारा वासनामध्ये लिप्त आहे, तो व्यक्ति ज्ञान-दर्शन व अनुत्तर संबोधिला प्राप्त करण्यास अयोग्य आहे.

हे राजकुमार ! नंतर मला तिसऱ्या अद्‌भूत व पूर्वी न ऐकलेल्या उपमाचे भान झाले. वाळलेले लाकुड पाण्यापासून दूर वाळलेल्या जागेवर फेकल्या गेले व एखाद्या पुरूषाने उत्तरारणी घेऊन यावे व म्हणावे की अग्नि उत्पन्न करील, उष्णता निर्माण करील, तर तो त्या वाळलेल्या पाण्यापासून दूर फेकलेल्या लाकडाला उत्तरारणीने घासून अग्नि उत्पन्न करील म्हटले तर अग्नि उत्पन्न करील काय ?

होय निश्चितच करेल.

का ?

भन्ते ! ते वाळलेले लाकूड आहे व पाण्यापासून दूर वाळल्या जागेवर फेकलेले आहे.

त्याचप्रमाणे हे राजकुमार ! एखादा व्यक्ति (समण किंवा ब्राह्मण) कायाद्वारे कामवासनेपासून अलिप्त असेल व तो आतून चांगल्याप्रकारे मुक्त झालेला असेल तर तो व्यक्ति दुःख, कष्ट भोगत नाही. तो ज्ञानदर्शन प्राप्त करण्यास योग्य होतो.-

तेव्हा हे राजकुमार ! मला वाटले की, मी दातावर दात ठेवून, जिभेद्वारा टाळूला दाबून, मनाने मनाला दाबावे, तेव्हा तसे केल्यामुळे काखेतून घाम निघायचा. ज्याप्रमाणे एखाद्या बलवान व्यक्तिने दुर्बल व्यक्तिच्या खांद्याला पकडून दाबावे. त्याचप्रमाणे माझ्या काखेतून घाम निघायचा. त्यावेळी मी दबणारा प्रयत्न प्रारंभ केला, स्मृती लोप झालेली नव्हती, काया सुद्धा जागृत होती.

तेव्हा मला वाटले मी श्वासरहित ध्यान का करू नये ? तेव्हा मी मुख आणि नाकाद्वारे श्वास घेणे-सोडणे थांबविले.

तेव्हा सर्व लोक मला म्हणायचे की, समण गौतम मेलेला आहे. काही म्हणायचे की, समण गौतम मेलेला नाही, मरणार नाही. समण गौतम अर्हंत आहे. अर्हंत अशाच प्रकारे विहार करीत असतो.

तेव्हा मला वाटले की, मी पूर्णपणे आहाराचा त्याग का करू नये. आणि मी पूर्णपणे आहाररहित राहू लागलो. परंतु माझे ते आहाररहित जीवन असत्य ठरले.

तेव्हा मला वाटले की मी थोडा-थोडा आहार का घेवू नये ? तेव्हा मी थोडा-थोडा मूंगाचा रस ग्रहण करून लागलो. तेव्हा माझे शरीर अतिशय दुबळे बनले. माझ्या पासळ्या काड्या सारख्या झालेल्या होत्या. माझ्या शरिरावरील कातडी वाळल्यासारखी झालेली होती. मी पोटाच्या कातडीला स्पर्श करीत होतो तर पाठीच्या कण्यांना स्पर्श होत होता. अतिशय अल्प भोजनामुळे पाठीचे काटे आणि पोटाची कातडी एकदम एकाला-एक चिपकून गेलेली होती. जेव्हा मी मलमूत्र विसर्जन करीत होतो तेव्हा तेथेच भोवळ येऊन पडत होतो. जेव्हा मी शरिराला चोळण्याचा प्रयत्न करीत होतो तेव्हा, हाताने अंग दाबत होतो तेव्हा शरिरातून सडलेल्या मळांचे रोम गळत होते. लोक मला पाहून म्हणत असत की, समण गौतम काळा आहे. काही लोक म्हणायचे की समण गौतम काळा नाही सावळा आहे. ते परिशुद्ध पांढरे कातडे असलेला रंग नष्ट झाला होता.

परंतु हे राजकुमार ! मला त्या कठिण चर्येमुळे उत्तर मनुष्यधर्म, उत्तर ज्ञान-दर्शन विशेष प्राप्त झाले नाही. तेव्हा माझ्या मनात असा विचार आला की, बोधिकरिता दुसरा एखादा मार्ग आहे काय ?

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

CamScanner

तेव्हा हे राजकुमार मला असे जाणवले की, मी माझ्या वडिलांच्या शाक्याच्या शेतावर जांभळाच्या शीतल छायेखाली बसून कामविकार व अकुशल बाबींना नष्ट करून पहिल्या ध्यानाला प्राप्त होऊन, विहार केला आहे. कदाचित तोच मार्ग बोधी प्राप्तीचा आहे, तेव्हा राजकुमार ! मला असे वाटले की जे सुख कामभोग व अकुशधर्मापासून वेगळे आहे त्या सुखाला मी घाबरतो काय ? नतर मला वाटले की मी त्या सुखाला घाबरत नाही. तेव्हा मला असे वाटले की, अशाप्रकारे अतिशय थकलेल्या वाळलेल्या शरिराने ते सुख मिळणे अशक्य आहे. तेव्हा मी थोडे भोजन-आहार, दाळ-भात का ग्रहण करू नये ! माझ्यासोबत पाच भिक्खू रहात असत. त्यांना वाटायचे की, समण गौतम ज्या धम्माला प्राप्त करेल, तो धम्म तो आम्हाला सुद्धा सांगेल. परंतु जेव्हा मी थोडे-थोडे भोजन ग्रहण करू लागलो तेव्हा ते पाचही भिक्खू असे समजून की समण गौतम बहुत संग्रह करणारा आहे, ध्यानापासून दूर गेलेला आहे, जोडणारा झालेला आहे हे जाणून, उदास होऊन, निघून गेलेत.

तेव्हा हे राजकुमार ! मी थोडे भोजन ग्रहण करीत सबळ झालो व कामभोग आणि अकुशल बाबीपासून अलिप्त होऊन वितर्क व विचारासह, एकांततेने उत्पन्न, प्रीती-सुखयुक्त पहिल्या ध्यानाला प्राप्त होऊन विहार करू लागलो. वितर्क व विचार शांत झाल्यानंतर, आतील प्रसन्नता - चित्ताची एकाग्रता मुक्त वितर्क विचाररहित समाधीद्वारे उत्पन्न प्रिती-सुखमुक्त दुसऱ्या ध्यानाला प्राप्त होऊन, विहार करू लागलो. प्रिती व विरागाची उपेक्षा करीत, स्मृती व संप्रजन्यसह, कायाद्वारे सुखाला अनुभव करीत विहार करू लागलो. अशा तिसऱ्या ध्यानाला प्राप्त करून विहार करू लागलो. सुख आणि दुःखाचा नाश करीत आधीच सोमनस्थ आणि दोमनस्थ संपल्यामुळे दुःखरहित, सुःखरहित उपेक्षा करणारा होऊन स्मृतीच्या परिशुद्धतेने मुक्त होऊन चौथ्या ध्यानाला प्राप्त होऊन विहार करू लागलो.

तेव्हा अशाप्रकारे चित्त परिशुद्ध झाल्यानंतर स्मृतीच्या ज्ञानाकरीता मी चित्ताला प्रवृत्त केले. अशाप्रकारे प्रमादरहित, सजग होऊन संमणमुक्त विहार करीत मला रात्रीच्या पहिल्या प्रहरामध्येही प्रथम विद्या प्राप्त झाली, अविद्या नष्ट झाली, विद्या उत्पन्न झाली, अंधकार नष्ट झाला, प्रकाश उत्पन्न झाला.

अशाप्रकारे चित्त परिशद्ध संपादित झाल्यानंतर मी माझ्या मनाला जन्म मरणाच्या ज्ञानाला प्राप्त करण्याकरिता वळविले. रात्रीच्या मध्यम प्रहरी मला ही दुसरी विद्या प्राप्त झाली अविद्या नष्ट झाली.

अशाप्रकारे चित्त परिशुद्ध संपादित झाल्यानंतर तेव्हा मी आपल्या चित्ताला आस्त्रवांना (चित्तांचे विकार) नष्ट करण्याच्या ज्ञानाकरीता प्रेरित केले की हे दुःख आहे याला योग्यप्रकारे जाणले, हे दुःख समुदय आहे हे योग्यप्रकारे जाणले, हे दुःख निरोध आहे हे योग्यप्रकारे जाणले, हे दुःख निरोधगामी मार्ग आहे, हे योग्यप्रकारे जाणले, हे आस्त्रव आहे. हे योग्यप्रकारे जाणले. हे आस्त्रव निरोधगामी मार्ग आहे हे योग्यप्रकारे जाणले व अशाप्रकारे जाणून, अनुभव करून माझे मन कामास्त्रवापासून पूर्णपणे मुक्त झालो. अविद्याआश्रवापासून मुक्त झालो. विमुक्त झाल्यानंतर विमुक्त झालो असे ज्ञान प्राप्त झाले. जन्म संपलेला आहे. उत्तम चर्या पूर्ण झालेली आहे, जे करायचे होते ते केलेले आहे. आता काहीही करण्यायोग्य नाही असे जाणले. राजकुमार ! रात्रीच्या अंतिम प्रहरामध्ये मला ही तिसरी विद्या प्राप्त झाली. अविद्या संपलेली आहे. अशाप्रकारे बोधिराजकुमार सुत्तामध्ये भगवान बुद्धाच्या जीवनासंबंधीची अतिशय महत्त्वाची कथा आलेली आहे. ही बुद्ध जीवनकथा अतिशय महत्वाची आहे. या बोधिराजकुमार सुत्तामध्ये व मज्झिमनिकायमध्ये झालेल्या अन्य सुत्तामध्ये जी बुद्ध कथा अर्थात बुद्धजीवनी आलेली आहे ती स्वतः भगवान बुद्धाने सांगितलेली आहे. एकप्रकारे हे भगवान बुद्धाचे स्वकथन, स्वतः सांगितलेले स्वतःचे चरित्र आहे. भगवान बुद्धाने सांगितलेल्या स्वकथनामध्ये अनेक बाबी अतिशय महत्वाच्या आहेत.

या स्वकथनामध्ये भगवान बुद्धाचे जे चारित्र आलेले आहे ते लौकिक स्वरूपाचे आहे, अलौकिक स्वरूपाचे नाही. मज्झिमनिकायमध्ये आलेले भगवान बुद्धाचे चरित्र हे फार विस्तृत स्वरूपाचे आहे असे नाही. परंतु या कथेमध्ये भगवान बुद्धाचा गृहत्यागापासून तर बोधिप्राप्तीपर्यतचा जो प्रवास आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'द बुद्ध ॲण्ड हिज धम्म' या ग्रंथामध्ये भगवान बुद्धाचे जे चरित्र वर्णन केलेले आहे त्यात मज्झिमनिकायमधील बुद्ध कथेचा बराच आधार आहे हे स्पष्टपणे म्हणता येईल.

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

CamScanner

संदर्भ सूची :

१. वि. वि. वि., इगतपूरी, प्रकाशन ख्माज्झिम निकाय १९९८ .

२. मोरे मा.श.मज्झिमनिकाय सुगावा प्रकाशन

३. वि. वि. वि., इगतपूरी, खंड - ५८, प्रकाशन (खूद्दक निकाये बुध्दवंसपाळी).

४. सिध्दार्थ, डॉ. जिनचरित, (२००७), ग्रंथ परिचय,

५. कौसल्यायन, डॉ. भदंत आनंद, बुध्दगयालंकार, (१९६०), प्रस्तावना,

6) धर्मरक्षित, डॉ. भिक्खू, सुत्तनिपात , (हिंदी), १९८३

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

Match -2020

SPECIAL ISSUE







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Impact Factor – 7.675

ISSN – 2278-93

B.Aadhar

Multidisciplinary International Research Journal

Peer-Reviewed Indexed

March - 2020

SPECIAL ISSUE – CCXXIV 224

Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.Dinesh W.Nichit
Editor :
Principal
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

Aadhar International Publications
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

CamScanner

Editorial Board

Chief Editor -
Prof.Virag S.Gawande,
Director,
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

Editors -

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**

Executive-Editors -

- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

Advisory Board -

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi ,**Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

Review Committee -

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.

- Executive Editor

Published by -

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

Email : aadharpublication@gmail.com **Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278

Principal
Dr. Babasaheb Ambedka
Mahavidyalaya, Amrava

CamScanner

INDEX

No.	Title of the Paper	Authors' Name
1	अहिराणी भाषेतील साहित्य व संस्कृती संवर्धन	डॉ. रत्ना लाला जवरास
2	१९५६ च्या धर्मांतराचा समाजजीवनावर पडलेला प्रभाव	डॉ.बी.एच.किर्दक
3	पर्यावरण विषय प्रशिक्षणाचा उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांवरील परिणामांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास.	विनोद वाघमारे / डॉ. अमोल मांडेकर
4	ई—कच—याचे व्यवस्थापन	प्रा. डॉ.सुनिल एन. ढेरे.
5	वामनराव चोरघडे — एक दृष्टिक्षेप	प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
6	दलित भारतीय कादंबरी : सामाजिक आणि सांस्कतिक अनुबंध	प्रा. डॉ.प्रभाकर रामचंद्र पवार
7	संतांची शिकवण काळाची गरज	प्रा.डॉ.उज्ज्वला पाटील
8	कविता–रती' या नियतकालिकातील कवितेतून प्रकटलेल्या महानगरीय जाणिवा	डॉ.श्रीकृष्ण पदमणे
9	डॉ. बाबासाहब अम्बेडकर का राजनैतिक एवं सामाजिक दर्शन भारत के सन्दर्भ में	प्रा. डॉ. यशवंत मेश्राम
10	"पश्चिम विदर्भातील एकुण ग्रामीण साक्षरता - एक भौगोलीक अभ्यास"	**प्रा. डॉ. राहुल देविदास इंगळे**
11	E- Governance मधील उपयोग	प्रा. डॉ. संजय उ. उल्हे
12	CHESS प्रशिक्षणाचा इंग्रजी शिक्षकांच्या अध्यापनावरील परिणामाचे सर्वेक्षणात्मक अध्ययन पांडुरंग टिकाराम कोळवते	/ डॉ.अमोल मांडेकर
13	वस्त्र धुलाई कला : एक परिचय	प्रा.सौ.सुषमा सु. जाजु
14	भारतीय अर्थव्यवस्था अधोगतिच्या मार्गाने जाण्याची कारणे व उपाययोजना	डॉ. केशव सुर्यभानसा गुल्हाने
15	राष्ट्रसंवर्धनात ग्रामगितेचा आरोग्य मार्ग	प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख
16	बुध्द तत्वज्ञानाचा मराठी संत साहित्यावर प्रभाव	**प्रा.डॉ. रजनी भिमराव गेडाम (सोनुले)**
17	"उच्च प्राथमिक स्तरावर इतिहास अध्यापनात शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांची परिणामकारकता अभ्यासणे."	डॉ.हर्षानंद पं.खोब्रागडे
18	महर्षी धोंडो केशव कर्वे आणि स्त्री शिक्षणाची चळवळ	प्रा. डॉ. कविता तातेड

Principal

19	स्त्री सक्षमीकरणात सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण विषयक कार्य व विचार — प्रा. स्वाती श्रीधर वैद्य	81
20	शाळा व्यवस्थापन समिती सभेतपुरुष व स्त्री पालक सदस्यांचा उपस्थितीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास. — अरुण लक्ष्मीनारायण धकाते / डॉ. अमोल मांडेकर	86
21	वर्तमान युग में गांधीवाद की प्रासंगिकता — प्रा. डॉ. राजेंद्र तातेड	94
22	अमरावती जिल्ह्यातील कृषी सिंचनाची समस्या — डॉ. संजय उ. देशमुख	98
23	Content Analysis of Special Issues of Indian Journal of Social Work (1940-1960) — **Dr. Varsha B. Patil**	102
24	A Study of Changing Preferences of Customers towards OLA Taxies in Nagpur City — **Dr. Vishal N. Thangan**	108
25	Child Health: The Role of Indian Government in Newborn Health and Nutrition Related Interventions. — **Prachi B. Bhamburkar,**	114
26	A critical study of emotional intelligence and its factors of trainee teacher students. — **Dr.Hemlata N. Turankar**	118
27	Harold Pinter – The Absurdist Playwright — Dr. Prafullachandra Ramesh Bhoge	123
28	Realism In George Eliot's Novel — **Dr Kaneez Quraishi**	127
29	Changing Teaching Strategies in the Age of Technological Interventions — **Dr. Smita V. Wadaskar**	131

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

CamScanner

B.Aadhar *International Multidisciplinary Research Journal*
Impact Factor - ((SJIF) –7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

बुध्द तत्वज्ञानाचा मराठी संत साहित्यावर प्रभाव

प्रा.डॉ. रजनी भिमराव गेडाम (सोनुले)
पाली विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.

बुध्द तत्वज्ञानाची पार्श्वभूमी :-

भगवान तथागताने आपल्या अमृत वाणीने आयुष्यभर मानवाला दया, करुणा, मैत्री, प्रेम इत्यादी तत्वांचीच आयुष्यभर लयलुट केली. परधर्म सहिष्णूतेचा मंत्र सर्वप्रथम त्यांनीच बौध्द अनुयायी व भिक्षुंना दिला. तर्कधिष्ठित बुध्दीवादाचा वारसा भारतालाच काय, अख्या विश्वाला मिळाला तो तथागतापासूनच. डॉ. पेंडसे यांचे मत,- मराठी संतावर बौध्दधर्माचा शिक्का लागू नये म्हणून अट्टाहासाने ते भागवतधर्मी आहेत, बुध्दधर्मी नाहीत असे निक्षून सांगणाऱ्या डॉ. शं.दा. पेंडसे यांनीच मराठी संतांनी बुध्दाचे तत्वज्ञानाविषयक ऋण स्वीकारल्याचे मान्य केले आहे. 'ज्ञानेश्वरीतील षडूदर्शनांच्या रुपकातील एक कोडे' या लेखात ते लिहतात, बौध्द तत्वज्ञान हे भारतीय तत्वज्ञानाच्या विकासातील एक महत्त्वाचा दुवा आहे. पं. सातवेळकर हे बौध्दांचे भंयकर द्वेष्टे होते परंतु यांनी बुध्दाचा राग संतावर काढीत असतांनाच बौध्दांच्या पथ्यावर पडणारे पण सत्य सार्टिफिकेट देऊन टाकले. ते म्हणतात, संतांच्या चळवळीत अंशतः ऋषिधर्म आहे. पण पुष्कळ बुध्द विचारच आहे. भरतसिंह उपाध्याय यांच्या मते, सन्त साधना वस्तुतः बौध्द धर्मका भग्न रुप ही है। बौध्द धर्म गिरते-गिरते भारत मे अपनी देन को साधना की उस अमिट विरासत के रुप मे छोड गया, जिसे हम आज सन्त साधना कहते है। मध्यकालीन सन्त बुध्द के ठीक उत्तराधिकारी है।

संतावर बुध्द प्रभावाची दिशा आणि संभावना :-

बुध्द तत्वज्ञानाचा संत साहित्यावर प्रभाव पडल्याची साक्ष प्राप्त झाल्यानंतर ह्या प्रभावाच्या दिशा आणि संभावनांचा विचार करणे, क्रमप्राप्त आहे. सामान्यपणे बुध्दद्वेषामुळे अनेक विद्ववानांना बौध्द धर्माच्या प्रभावाची कल्पना सुध्दा सहन करवत नाही. येथे स्पष्टपणे नमुद केले पाहिजे की, बुध्द प्रभाव (संतांवर) सर्वच आणि प्रत्येकच बाबतीत दिसून येतो असा दुराग्रह मनाशी धरुन आम्ही आमच्या मताचे प्रतिपादन करायला निघालो नाही. ऐतिहासिक आणि ग्रंथिक पुराव्यातून प्राप्त झालेल्या वस्तुस्थितीच्या आधारेच हा विचार मांडावयाचा आहे.

महाराष्ट्रात बौध्दधर्माचा प्रसार :- महाराष्ट्रातील बौध्द धर्मासंबंधी शंकेचे निरसन करणे आवश्यक आहे. अखिल जगात ज्यांच्या पर्वतकुशीत विसावणाऱ्या अजिंठा, वेरुळ, कार्ले भाजे, कान्हेरी नाशिक इत्यादी ठिकाणच्या लेण्यातील चित्रकलेची आणि शिल्पकलेची कीर्ती दुमदुमत आहे. असे विहार, स्तुप, चैत्य लेण्यांच्या निर्मीतीचे श्रेय एखट्या महाराष्ट्रालाच जातो. महाराष्ट्रात बौध्द धर्म किती वायूगतीने पसरला आणि समाज जीवनात रुजून स्थिरस्थायी झाला त्याची साक्ष देण्यासाठी काळाच्या उरावर पाय गाडून दीपस्तंभासारख्या अखंड उभ्या असलेल्या त्या लेणी म्हणजे इतिहासाच्या पावन पाऊल खुणाच होत. भारतातच नव्हे अवघ्या विश्वात बौध्द धर्माची पताका फडकविण्यासाठी धडपड करणाऱ्या महाराजा अशोकाने द्वितीय धर्मसंगीती संपन्न केल्यानंतर जे धर्मप्रचारक अनेक ठिकाणी पाठिवले. त्यांच्यात 'महाधर्मराख्वित' नावाचा भिक्षू महाराष्ट्रात पाठविल्याचा उल्लेख आहे.

सातवाहनकाळ :- सातवाहनांच्या काळात सुध्दा बौध्द धर्म महाराष्ट्रात नांदत होता. महाराष्ट्रातील उत्खनने याविषयी डॉ. शं.बा. देव म्हणतात सातवाहन काळात बौध्द धर्माचा प्रसार महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात झाला होता हे सर्वश्रृत आहे. त्याचा पुरावाही उत्खनित अवशेषात पाहावयास मिळतो. नेवाश्याला सापडलेला माताचा चैत्य, नाशिकचा छोटा स्तुप व मडक्यावरची अथवा पाट्यावरील त्रिरत्न धर्मचक्र यांस दुजांरा देतात. याशिवाय मातीचे बनविलेले त्रिरत्नाचे ताईतही लोक वापरीत असत. रामटेक जवळ मनसर या ठिकाणी बौध्दकेंन्द्र होते. तसेच काही दिवसापूर्वी भंडाऱ्या नजिक वैनगंगेच्या तिरावर वसलेल्या पवनी या गावी सांचीच्या पध्दतीचा स्तुप उत्खननात सापडला आणि तेथेही बौध्दधर्माचे केंद्र असल्याचे सिध्द झाले.

नाग व महाराष्ट्र :- सातवाहनपूर्व काळात महाराष्ट्रात नागांचे प्राबल्य होते. महाराष्ट्रातील नाग स्वतः 'महारठी' हे बिरुद लावून घेत. ह्या नागराजाचा समुद्रवलयांकित पृथ्वीवरील प्रथम वीर असा त्यांचा गौरव सातवाहनांच्या लेखात आहे आणि सातवाहनांनी नागांशी सोयरिक केली आहे. शुन्यवादाचे प्रवर्तक आचार्य नागार्जुन हे विदर्भातच जन्मले होते. गौतमीपूत्र यज्ञाश्री हा सातवाहन

Principal

राजा त्यांचा मित्र होता. आचार्य नागार्जुनाने राजा त्यातवाहनला उपदेशपूर्ण पत्र लिहिले. त्यात त्याला तिन्ही सागराला (दक्षिण-हिंदमहासागर व बंगरवाडी) चा स्वामी म्हटले आहे.

बाकाटक काळ :- सातवाहनानंतर महाराष्ट्रात बाकाटकांची राजवट प्रभावी ठरली इ.पू.२५० ते ५५० पर्यन्त या राजवट भूमीतून उदय पावून दुरवर पराक्रम केले. वाकाटकांच्या आमदनीत बौध्द धर्मालाही भरपूर आणि भव्य आश्रय आश्रयाची स्पष्ट साक्ष म्हणून अजिंठा येथील सोळा, सतरा व एकोणीस या क्रमाकांची लेणी पाहावी. या कलासुंदर धर्मावरील श्रध्देने चिरमनोरम असे मूर्तरुप धारण केले.

नाग आणि बुध्द लेणी :- वाकटकांनी नागवंशीय राणीच्या कन्येशी विवाह केला होता. त्यांच्या मंत्री व मांडलीकामध्ये प्राबल्य असावे कारण अजिठ्यांतील लेण्यात व चित्रात नागांचे प्रकर्षाने दर्शन घडते. काही चित्रे नागवंशी लोकांनी अजिंठ्याची लेणी बहुदा या नागवंशीय लोकांनीच कोरलेली आहेत. अनेक लेण्यातून डोक्यावर फणा असलेल्या नागांना कोरलेली आहेत. आणि चित्रेही काढलेली आहेत. नागवंशीयांचे बौध्द धर्मविषयक प्रेम इतिहास प्रसिध्द आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर हेच आपल्या धर्मदीक्षेचे शहर निवडतांना त्याच गोष्टीचा प्रामुख्याने विचार करुन होता.

वारकरी व नाथपंथ :- महाराष्ट्रातील बौध्द धर्माच्या इतिहासाचे अवलोकन केल्यानंतर मराठी संतचळवळीची नाथपंथाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी आपली गुरुपरंपरा सांगतांना नाथसंप्रदायाशीच नाते या विष्णूभक्तिच्या वारकऱ्याने आपल्या विच्यारांची गंगोत्री नाथांच्याच ठिकाणी मानलेली आहे. या संदर्भात प्रा. विन ह्यांचे मत विचारणीय आहे. ते म्हणतात 'वारकरी पंथांचे मूळ स्थान नाथपंथ होते आणि त्याचाच प्रभाव नामदेवावर नाथ संप्रदाय हा भारतीय विचारधारेतला महत्त्वाचा प्रवाह समजला जातो.

बुध्द तत्वज्ञानाचा मराठी संत साहित्यावर प्रभाव -

मत्सेंद्रनाथ व गोरखनाथासारखे युगपुरुष या संप्रदायाने निर्माण केले आहेत. अनेक विद्वतांनानी नाथ पंथ हा असलेल्या ८४ विद्ववानापासून निघालेला एक क्रांतीकारी पंथ मानले आहे. बाराव्या शतकात बंगाल व पूर्व भारत मानणाऱ्या योग्यांच्या अनुयायामध्ये बौध्दांची संख्या असंख्य तर ब्राह्मण धर्मी अत्यल्प होते.

नाथ हे बुध्दाचे नाव :- या संदर्भात एक योगायोग असा की बुध्दाच्या अनेक नावापैकी 'नाथ' हेही एक नाव साहित्यात 'नाथ' शब्द उपलब्ध होतो. तथागत आणि ज्ञानप्राप्त भिक्षू म्हणजे अर्हत या अर्थी 'नाथ' शब्द वापरला बौध्दांचे स्नेहसंबंध नेपाळमध्ये संतुलित असल्यासारखे दिसून येतात. ही जवळीक म्हणजे शैवपंथाने बौध्द धर्म करण्याच्या प्रयत्नाचेच फळ होय. नेपाळमध्ये गोरखनाथाला गोरखालोक प्रमुख अधिरक्षक देवतेच्या रुपात पाहाडावर त्यांचे मंदीर लाखोलोकांचे तिर्थक्षेत्र आहे. पशुपतीनाथांच्या मंदीरापुढील गोरखनाथांचे मंदीर श्रध्दापुर्वक जाते. तिबेटी बौध्दर्माच्या इतिहासात गोरखनाथाला महत्त्वपूर्ण स्थान असून ते एक प्रमुख बौध्द भिक्षूंच्या रुपात गोरखनाथासंबंधी असे म्हटले जाते की ते प्रथम बौध्द होते, नंतर शैव झाले. हेच मत लामातारानाथ यांचेही आहे. की ते स्वतःबरोबर बौध्द आचार व विचार प्रणालीचा वारसा नक्कीच घेवून शैवपंथात आले. नाथांनी बुध्दापासून चिन्तन, संयम, विरक्ती, प्राणायाम इत्यादींचा वारसा घेतला. हठयोग देखील त्यांनी बौध्दापासूनच घेतला. असलेली आनापानसति नाथामध्ये जावून अनाहत नादात रुपातंरीत झाली.

शैव व वैष्णवांनी बौध्दतत्वे आत्मसात केली :- शैव व वैष्णवांनी बौध्दांच्या विहार व मुर्तीचा जसा ताबा घेतला वैशिष्टपूर्ण तत्वांनाही आत्मसात करुन टाकले. वैष्णवसंतामध्ये भक्ती तत्वांचा महिमा प्रकर्षाने गाईलेला आढळ निर्गुण अशा दोन परंपरा संतात आढळतात. सद्गुण परंपरेत राम व कृष्णभक्तीचा अंतर्भाव होतो. रामानंद व भक्ती मार्गाचा प्रचार केला. कृष्णभक्ती वल्लभाचार्याच्या मतावर आधारित होती. या भक्तीपरंपरेचा संबंध तत्वांशी अधिक आहे. निगुर्ण परंपरा मात्र श्रमण परंपरेशी म्हणजेच बौध्द धर्माशी निगडीत आहे. एक महत्त्वाचे पारिभाषिक धार्मिक अर्थामध्ये भक्ती शब्दाचा सर्वप्रथम वापर बौध्द साहित्यातच आढळतो. कोणत्याही वैष्णव बुध्दाचे रुपकाय आणि धर्मकाय हे सद्गुण व निर्गुण भक्तीतत्वाच्या मुळांशी आहे.

विठ्ठल हा बुध्दच :- बाराव्या शतकातील कवी जयदेव याने पुराणांच्या आधारावरच नववा अवतार म्हणून बुध्दा मराठी सतांनी तर त्यांचे आराध्यदैवत विठ्ठलच ह्यालाच बुध्द मानले आहे. संत एकनाथ बुध्दालांच विठ्ठल

Principal
Babasaheb Ambedkar

CamScanner

लोकांना उन्मत व धनदारात आसक्त पाहून हे विठ्ठला तू बुध्दरुप धारण करुन कमरेवर हात ठेवून बुध्द अवतार घेऊन तू विटेवर उभा आहेस. पुरीचा जगन्नाथ सुध्दा बुध्दच असल्याचे अनेक पूराण्यावरून सिध्द होते.

भगवद्गीतेवर बुध्द तत्वाचा प्रभाव :- मराठी प्रेरणेच्या मुळाशी असलेल्या स्त्रोतस्वरुप धर्मग्रंथावर देखील बुध्द तत्वाचा प्रभाव पडल्या वाचून राहिला नाही. सर्व मराठी संतांनी गीता, भागवतपुराण व योगसुत्राचा वारंवार उल्लेख केलाँ आहे. त्यापैकी गीता हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. भगवतगीता हा ग्रंथ महाभारतातील एक भाग असल्यामुळे तो बुध्दोत्तर कालीन आहे यात संशय नाही. आणि त्यात पिंपळमहात्म्य, वेदविरोध, अर्हतांचे गुण विहार, अहिंसा, यज्ञविरोध इत्यादी बौध्द धर्मातील खुना आढळुन येतात. त्याच्या आधारावर देखील गीता बुध्दोत्तर कालीनच ठरते. गीतेच्या निर्मितीची पार्श्वभूमीच मुळी बुध्दतत्वज्ञानाला काही मर्यादेपर्यंत आत्मसात करुन घेऊन गैरसोईच्या वाटणाऱ्या तत्वांना मुरड घालून किंवा न कळत अप्रत्यक्षरीत्या त्यांना प्रत्युत्तर देण्यावर आधारित आहे. बुध्दाचा रोहीणी नदीच्या पाण्याच्या प्रसंग आला. गीताकरांनी कर्महीनात कर्म मानून कर्मवाद असे नाव दिले. या तत्वज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अर्जुनाला भगवान कृष्णाने नातेवाईकांच्या विरुध्द लढायचा उपदेश दिला. भगवद्गीतेवर बुध्द तत्वाचा प्रभाव मान्य करणे अतिशय कठीण काम असल्यामुळे अनेक विद्ववानांनी एक तर हा प्रश्नच टाकून दिला. भारतीय विद्ववान श्री. तेलंग, भांडारकर, लो. टिळक, रानडे, डॉ. राधाकृष्णन यांनी स्पष्टपणे बौध्द प्रभावाची शक्यता नाकारली. प्रसिध्द जर्मन विद्वान गार्ब यांनी मात्र गीतेचा काळ इ.स. २०० मानून अनेक विचारांचा गीतेवर बौध्द प्रभाव असल्याचे मान्य केले आहे.

योग सुत्रांवर बुध्द तत्वाचा प्रभाव :- गीतेमध्ये योगाचे महात्म्य फारच वर्णिले आहे. भगवंताने बुध्दत्वप्राप्तीपूर्वी सर्वप्रकारच्या त्याकाळी विद्यमान साधनांचा अभ्यास केला होता. भगवान बुध्द स्वतः योगी होते. शंकराचार्यांनी आपल्या एका स्त्रोतात स्वतः भगवतांला 'योगिनी चक्रवर्ती' म्हणून गौरविले आहे. योगदर्शन हे एक साधनेचे तत्वज्ञान आहे, तो एक मार्ग आहे. आणि ह्या अर्थाने बुध्दमार्गाशी त्याचे फार साम्य आहे. चित्तवृत्तींचा निरोध याला योग म्हटले आहे. महायान बौध्दधर्मामध्ये थोराचार (विज्ञानवाद) संप्रदायाच्या परिणामाचे फळ म्हणून योगाचा प्रचार वाढला. बोधिसत्वाला महायोगी म्हटले गेले. योगमार्ग देखील दुःख, दुःख सपुदय, दुःख निरोध आणि दुःख निरोध गामीनी मार्ग ह्या चतुविध समस्येच्या विभाजनानेच आरंभ होतो.

पतंजल योगसुत्रांवर बुध्द प्रभाव :- बुध्दमार्ग आणि योगामार्ग मध्ये केवळ विखुरलेल्या सिध्दान्तांमध्ये समानता आहे असे नव्हे तर आतल्या मुलभूत बाबतीतही दोन्ही तत्वज्ञानात साम्य आहे. चिकित्साशास्त्राने चार आर्यसत्याच्या पध्दतीनेच आपले निवेदन केले आहे. अश्या प्रकारे बौध्द तत्वज्ञानाप्रमाणे योगदर्शनाने देखील 'दुःखमेव सर्व विग्नेकीन' असे म्हणून दुःख आर्यसत्याचाच पुरस्कार केला आहे. योग आणि बौध्द दर्शनातील साम्यकाळाचा विचार केला असता बौध्दाचेच ऋण योगशास्त्रांवर असल्याचे आढळून येते.

बुध्दाचा चितंनाचा केंद्रबिंदू माणूस हाच होता. बुध्दतत्वज्ञान जीवनाच्या धाग्याशी माणसाला अतुटतेने जोडू पाहत होते. ज्ञान तत्वज्ञान ही जीवनपध्दती व्हावी अशी त्यांची तळमळ होती. माणसाला पंगु नव्हे तर स्वयंप्रकाशित करण्याचा त्यांचा संकल्प होता. प्राचीन कालीन बौध्द साहित्यातील मार्गदर्शक तत्वांची आजही जगाला गरज आहे. अनेक देशांनी युध्दाला नव्हे तर बुध्दाला अंगीकारले आहे. कारण मानवात स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय ही मुल्ये रुचवायची आहेत. बुध्दाचे हेच तत्व अंगीकरुन मराठी संतांनी समाजप्रबोधन केले आहे.

संदर्भ ग्रंथ -

१. डॉ. उपाध्याय भरतसिंह, 'पालि साहित्य का इतिहास', हिंदी साहित्य सम्मेलन, प्रयाग- १९९४
२. डॉ. उपाध्याय भरतसिंह, बौध्ददर्शन तथा अन्य भारतीय दर्शन, मोतीलाल बनारसीदास पब्लिशर्स, दिल्ली- १९९६
३. डॉ. लोखंडे भाऊ, मराठी संत साहित्यावर बौध्द धर्माचा प्रभाव, अशोक प्रकाशन. नागपूर-१९७९
४. डॉ. मोरे मा.श., जगातील बौध्दधम्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद-२००६
५. डॉ. गोनारकर संघमित्रा, बौध्द शिक्षण प्रणाली, निर्मल प्रकाशन, नांदेड - २००९
६. डॉ. गव्हाळे बालाजी, पाली भाषेची ओळख, एहिपास्सेको प्रकाशन, पुणे-२०१०
७. डॉ. उपाध्याय भरतसिंह, बुध्दकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य संमेलन, प्रयाग-इलाहाबाद-२००९.

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

CamScanner

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308


B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July-2020

ISSUE NO-CCXL(240)







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head,Deptt.of Economics,
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

CamScanner

19	कोरोना संसर्ग नंतर भविष्यातील भारतीय अर्थव्यवस्था प्रा. डॉ. गोवर्धन खेडकर	81
20	भुलाबाईच्या गितातील लोकतत्वे प्रा.डॉ. राजेंद्र हावरे	84
21	स्वातंत्र्योत्तर भारतीय महिलांची स्थिती डॉ. अश्रु जाधव	88
22	भारतीय किटकनाशक उद्योग-- फलश्रुती विषाक्त अन्न: एक विवेचन कल्पना एस भावे	91
23	संत एकनाथांचे भागवत तत्त्वज्ञान डॉ. जयश्री शास्त्री	98
24	संत तुकाराम—सामाजिक प्रबोधनाचे मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक डॉ.प्रेमा लेकुरवाळे (चोपडे)	102
25	भारतातील फलोत्पादन विकास : समस्या व उपाय डॉ. दत्तात्रय निवत्तीराव घोडके	106
26	लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीतील आर्थिक विचार डॉ.पल्लवी ताजने	112
27	पर्यावरण व अर्थव्यवस्था संबंध प्रा. डॉ. लोकचंद जाधव	118
28	विस्थापीत आदिवासीयों की सामाजिक आर्थिक स्थिती मे परिवर्तन एव प्रभाव (टायगर प्राजेक्ट धारणी) प्रा.डॉ. बाळकृष्ण पुं.अढाऊ	122
29	महात्मा फुले इनका पुनर्जागरण और सत्यशोधक समाज की स्थापना प्रा. ज्ञानेश्वर तुळशीराम शेन्डें	125
30	Impact of personality characteristics and emotional intelligence on teaching effectiveness **Dr. Sushma Dujendra Sharma /Mrs.Sujata Rajesh Gandhi**	131
31	Deconstructive Analysis ofthe Short Story "Saleema" By Daniyal Mueenuddin **Dr Veena Ilame**	137
32	Group dynamics and educational implication. **Vanita Ramteke**	145
33	Impact of Buddhism On Global Social Life. **Prof.Dr.Rajani Bhimrao Gedam**	149
34	'COVID-19': As a cause of misery and agony of vulnerable groups in India. "Eradicate poverty not the poor." **Dr.P.E.Bhosle**	151
35	कोरोना समस्ये दरम्यान ऑनलाईन शिकवणी वर्गामुळे किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन डॉ. माया प्रभाकर शिरखेडकर	155

CamScanner

adhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO. 240 (CCXL)
ISSN : 2278-9308
July,2020

Impact of Buddhism On Global Social Life.


Prof.Dr.Rajani Bhimrao Gedam
Pali & Prakrit Dept. Dr.Babasaheb Ambedkar Mahavidhyalya Amravati

Buddha is the first scientist in the world. In this era of globalization, the Buddhist ethics is actually a way to rebuild the world. Ethics is the basic foundation of Buddhism. Panchasila (Five Precepts), Ariya Atthangika Magga(**The Noble Eight Path**) ,Dasa Pāramiyo (**Ten** Perfections) of Buddhism is absolutely suitable to make man moral.

Meaning Of Globalization :

According to Wikipedia-'Globalization **or** Globalisation is the process of interaction and integration among people, companies, and governments worldwide'

Globalization means the establishment of a central economic system in the whole world. Due to globalization, the whole world came very close, such as a village. In the process of globalization, the industry-business has gained momentum and economic business is also getting benefits. But positive and negative results have started coming from this process on social life.



Positive Results Of Globalization :

Today, education has started increasing due to globalization. The youth of today's generation have started abandoning old orthodox thoughts and adopting new scientific ideas.

Negative Results Of Globalization :

With the advancement of human beings in the process of globalization, serious consequences are coming on the social system. Human desires are increasing day by day. Craving(*tanhā*) increasing in life and if it is not fulfilled, a person has to go through many problems. No one can solve it.

Relevance Of Buddhism :

In today's world, fear, tension, terror and instability spread in all areas social, economic, political, religious. Only Buddhism can guide in such difficult times. Today the poison of fear, terror, inequality has spread badly in the whole world Looking at the problems and objections of today, Buddhism seems to be more relevant.

Importance Of Ethical Values :


The teachings that Buddha has given seem more appropriate today. Buddha insisted in

Buddha's teachings can solve any problem. Buddha says, before accepting what I say, test it on the test of your conscience. Buddha never forced to accept his Dhamma. He used to guide people of different levels on every problem, so that every human being is well being, every human is happy.

Effects Of Globalization On Nature :

The process of globalization creates inequality in states. Natural resources are used more and more in developing countries.

Buddha says that take as much from nature as is necessary. The least use of natural resources also keeps the environment balanced.



Buddhist Ethical Values For Students :

In the process of globalization, conflict is increasing. Everyone is competing to go ahead of each other. Children of such a society cannot become good citizens. Ethical values are declining. If children are taught Buddhist moral values in primary school education, then it will have a very positive impact on their lives. By becoming a good moral person, they can contribute to the creation of a good nation.

Need Of Thoughts Of Buddha

No problem of the world or country can be solved by violence or war. The principle of Buddha who gives the message of Truth, Non-violence as well as Wisdom, and Compassion can solve all the problems of the world.

Wherever there is conflict in the world, there is a need to walk on the path of Buddha. The countries that have accepted Buddhism have made great progress. There is a place of peace. No problem can be solved through violence. For this peace, loving-kindness is needed and this peace can be attained only through Buddhism.

Atta Deep Bhava-**Enlighten Yourself :**

Buddha has presented ***Bahujanhitāya Bahujansukhāya*** such a Buddha Dhamma to the world, so that every human can live a happy life. Buddha said to be a self-guide be yourself and live your bright life. This is the path to success.

The path that Buddha has shown to end the problems of globalization is the humanitarian path. The relevance of Buddhism in the present world seems to be more than the Buddha period. No country can establish peace without Buddhism. There is no such system in the world through which an ideal society can be established.

Essentials Of Buddhist Ethics :

Problems prevailing in the world are resolved by Buddha's teachings, through practicing ***Sīla*** (Virtue), ***Samādhi*** (Concentration), and ***Paññā*** (Wisdom). If every person follows ***Tisarana*** (Three Refuges), ***Pañcasīla*** (Five Precepts), ***Ariya Atthangika Magga***(The Noble Eight Path) then every person can lead a happy life after being free from all sorrows. If the world has to follow the path of development, then Buddhist ethics are the solution to every problem, this is the eternal truth.

CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B..Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

June-2020

SPECIAL ISSUE-CCXXXI (231)

Challenges in the 21st Century & Need of Gandhian Ideology



Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA AMRAVATI
127

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. V.L.Bhangdia
Principal
Smt.Kesharbai Lahoti
Mahavidyalaya, Amaravati
Dist. Amravati.

This Journal is Indexed in :
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Service (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

June-2020

ISSUE- CCXXXI (231)

Challenges in the 21st Century & Need of Gandhian Ideology

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr. V.L.Bhangdia
Principal
Smt.Kesharbai Lahoti
Art's Comm,Mahavidyalaya,
Dist. Amravati.

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

CamScanner

Editorial Board

Chief Editor -
Prof.Virag S.Gawande,
Director,
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

Editors -

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**

Executive-Editors -

- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

Advisory Board -

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan

Review Committee -

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.

Editor

Published by -
- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

Email : aadharpublication@gmail.comWebsite : www.aadharsocial.com Mobile : 9595560278

CamScanner

INDEX

No.	Title of the Paper	Authors' Name	Page No.
